महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव

पत्ता - ए विंग, श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, जळगाव
Email - dsojal7080@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : ०२५७ - २२३७०८०

जा.क्र. जेएलजी /डीएसओ/एमएलव्ही/ईटीडी/२०२५-२६/डीएसके-३/२०२६/१५१ दि.१९ मे, २०२६

# ई-निविदा सुचना (दुसरी वेळ) क्रमांक :-

**दिनांक १९-०५-२०२६ ते दिनांक २६-०५-२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत**

**मिशन लक्ष्यवेध योजना अंतर्गत जिल्हास्तरावर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,**जळगाव येथे जिल्हा प्रतिभा विकास केंद्राकरीता खालीलप्रमाणे पदे एक वर्षाच्या कालावधीत भरण्याकरीता निम्नलिखीत प्रमाणे संस्थाकडून ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निवीदेतील अटी व शर्तीनुसार पदनिहाय प्रती महिना दर मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचा तपशिल | खेळाचा प्रकार | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | क्रीडा प्रशिक्षक | ॲथलेटिक्स | १ |
| २ | क्रीडा प्रशिक्षक | कुस्ती | १ |
| ३ | क्रीडा प्रशिक्षक | वेटलिफ्टिंग | १ |
| ४ | क्रीडा प्रशिक्षक | बॅडमिंटन | १ |
| ५ | क्रीडा प्रशिक्षक | बॉक्सींग | १ |

| अ.क्र | कामाचे स्वरुप | निविदा एकुण रक्कम १८% जि.ए.टी.सह. | निविदा फी | अनामत रक्कम | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | **क्रीडा प्रशिक्षक** :- १. खेळाडूंना दैनंदिन संबंधित खेळाचे प्रशिक्षण देणे.<br>२. खेळाडुंच्या परफ़ॉर्म्स बाबत आवश्यक तो दैनंदिन /मासिक डाटा/assignments संकलित करुन डिजीटलाईज करुन अपडेट करणे.<br>३. मा.जिल्हा क्रीडा अधिकारी यांना मासिक अहवाल सादर करणे. | २४,००,०००/- (रु.चोवीस लक्ष मात्र) | ६०००/- | १००,०००/- | कर्मचारी पुरविणे बाबत शासन मान्यता असलेली संस्था किंवा कंपनी |

## निविदा प्रक्रीयेचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचे टप्पे | पूर्ण करण्याकरीता शेवटचा दिनांक |
|---|---|---|
| १. | ई-निविदा प्रसिद्ध करणे | दिनांक १९-०५-२०२६ |
| २. | Pre-Bid Meeting | दिनांक २१-०५-२०२६ दुपारी १२.०० वाजता,<br>जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जळगाव<br>पत्ता- श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, जळगाव |
| ३. | ई-निवीदेची सर्व प्रक्रीया राबविणे | दिनांक १९-०५-२०२६ ते दिनांक २६-०५-२०२६ |
| ४. | इसारा रक्कम Online पद्धतीने भरण्याची अंतिम तारीख | दिनांक २६-०५-२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता |
| ५. | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक २६-०५-२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता पर्यंत |
| ६. | निविदा उघडणे | दिनांक २७-०५-२०२६ रोजी दुपारी ०३.०० नंतर |

## ई-निवीदेतील अटी व शर्ती

१. निविदा Upload करण्याचा कालावधी दिनांक १९-०५-२०२६ ते दिनांक २६-०५-२०२६ वेळ दुपारी ३.०० पर्यंत राहील. निविदा उघडण्याची वेळ दिनांक २७-०५-२०२६ रोजी दुपारी ०३.०० नंतर.

२. जी संस्था किंवा कंपनी कर्मचारी पुरविण्याकरीता शासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे आधारे मान्यता प्राप्त असेल त्याच संस्थेने / कंपनीने निविदेमध्ये भाग घ्यावयाचा आहे. या व्यतिरिक्त संस्थेनी / कंपनीने भाग घेतल्यास ती संस्था अप्राप्त राहील.

३. भाग घेणारी संस्था, कंपनी केवळ मर्यादित / खाजगी मर्यादित कंपनी, कंपनी कायदा १९५६ अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था किंवा मालकी संस्था असावी जी निवीदेतील अटी व शर्ती पात्रता निकषांमध्ये पात्र ठरतील अशाने निवीदेत भाग घ्यावयाचा आहे. संस्था नोंदणी प्रमाणपत्र शॉप ॲक्ट प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

४. संस्थेजवळ / कंपनी जवळ कर्मचारी पुरविण्याबाबत परवाना लायसन्स, जी.एस.टी. प्रमाणपत्र, पॅनकार्ड, आयकर रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, भविष्य निर्वाह निधी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

५. क्रीडा प्रशिक्षक यांच्याकडे खालील अर्हता पात्र उमेदवार असणे आवश्यक आहे.

### १. ॲथलेटिक्स :- जिल्हा प्रतिभा विकास केंद्रस्तरावरील प्रशिक्षक निवड निकष

| अ.क्र. | तपशील | विवरण |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक पात्रता | किमान : मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>प्राधान्य : B.P.Ed/ M.P.Ed/ क्रीडा विज्ञानातील पदवी |
| २. | प्रशिक्षण पात्रता | अनिवार्य : NSNIS डिप्लोमा इन कोचिंग (ॲथलेटिक्स) किंवा समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केलेले किंवा वर्ल्ड ॲथलेटिक्स संघटनेचा लेव्हल १ कोर्स पूर्ण केलेले किंवा सहा आठवड्याचा NSNIS सर्टिफिकेट कोर्स उत्तीर्ण केलेले उमेदवार असावा. |
| ३. | अनुभव | किमान : राज्य स्तरावर १ वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव<br>प्राधान्य :-राज्य/राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी खेळाडूंना प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक किंवा युवा खेळाडूंसोबत काम करण्याचा अनुभव असलेले प्रशिक्षक |
| ४. | वयोमर्यादा | किमान :- २१ वर्षे कमाल :-४५ वर्षे |
| ५. | भाषा प्राविण्य | मराठी अनिवार्य, इंग्रजी प्राधान्य |
| ६. | क्रीडा पार्श्वभुमी | आंतरराष्ट्रीय/ राष्ट्रीय/ राज्य स्तरावरील पदक प्राप्त खेळाडू असावा. |
| ७. | संगणक कौशल्य | अनिवार्य : खेळाडु प्रगती नोंदी, अहवाल तयार करणे व डेटा ट्रॅकिंग करीता मुलभूत संगणक प्राविण्य आवश्यक |
| ८. | वैदयकीय तपासणी | शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडुन दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य. |

### २.कुस्ती :- जिल्हा प्रतिभा विकास केंद्रस्तरावरील प्रशिक्षक निवड निकष

| अ.क्र | तपशील | विवरण |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक पात्रता | किमान: मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>प्राधान्य: B.P.Ed / M.P.Ed / क्रीडा विज्ञानातील पदवी. |
| २. | प्रशिक्षण पात्रता | अनिवार्य: NSNIS डिप्लोमा इन कोचिंग (कुस्ती) किंवा समतुल्य अभ्यासक्रम पूर्ण केलेले किंवा प्रशिक्षकाकडे UWW स्तर १ किंवा २ कोचिंग प्रमाणपत्र असणे आवश्यक किंवा सहा आठवड्याचा NSNIS सर्टिफिकेट (कुस्ती) कोर्स उत्तीर्ण केलेला उमेदवार असावा. |
| ३. | अनुभव | किमान : राज्य स्तरावर १ वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव<br>प्राधान्य :-राज्य/राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी खेळाडूंना प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक किंवा युवा खेळाडूंसोबत काम करण्याचा अनुभव असलेले प्रशिक्षक |
| ४. | वयोमर्यादा | किमानः २१ वर्षे कमाल: ४५ वर्षे |
| ५. | भाषा प्राविण्य | मराठी: अनिवार्य, इंग्रजी: प्राधान्य |
| ६. | क्रीडा पार्श्वभुमी | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / राज्यस्तरावरील पदक प्राप्त खेळाडू असावा. |
| ७. | संगणक कौशल्य | अनिवार्य: खेळाडू प्रगती नोंदी, अहवाल तयार करणे व डेटा ट्रॅकिंग करीता मूलभूत संगणक प्राविण्य आवश्यक |
| ८. | वैदयकीय तपासणी | शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य. |

### ३. वेटलिफ्टिंग :- जिल्हा प्रतिभा विकास केंद्रस्तरावरील प्रशिक्षक निवड निकष

| अ.क्र | तपशील | विवरण |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक पात्रता | किमान: मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>प्राधान्य: B.P.Ed / M.P.Ed / क्रीडा विज्ञानातील पदवी. |
| २. | प्रशिक्षण पात्रता | अनिवार्य: NSNIS डिप्लोमा इन कोचिंग (वेटलिफ्टिंग) किंवा समतुल्य अभ्यासक्रम पूर्ण केलेले उमेदवार किंवा जागतिक वेटलिफ्टिंग संघटनेचा लेव्हल १ कोर्स पूर्ण केलेले किंवा सहा आठवड्याचा NSNIS सर्टिफिकेट कोर्स उत्तीर्ण केलेले उमेदवार असावा. |
| ३. | अनुभव | किमान : राज्य स्तरावर १ वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव<br>प्राधान्य :-राज्य/राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी खेळाडूंना प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक किंवा युवा खेळाडूंसोबत काम करण्याचा अनुभव असलेले प्रशिक्षक |
| ४. | वयोमर्यादा | किमानः २१ वर्षे कमाल: ४५ वर्षे |
| ५. | भाषा प्राविण्य | मराठी: अनिवार्य, इंग्रजी: प्राधान्य |
| ६. | क्रीडा पार्श्वभुमी | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / राज्यस्तरावरील पदक प्राप्त खेळाडू असावा. |
| ७. | संगणक कौशल्य | अनिवार्य: खेळाडू प्रगती नोंदी, अहवाल तयार करणे व डेटा ट्रॅकिंग करीता मूलभूत संगणक प्राविण्य आवश्यक |
| ८. | वैदयकीय तपासणी | शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य. |

६. क्रीडा प्रशिक्षक वेतन नियमाप्रमाणे व इतर देणी दरमहा देणे बंधनकारक राहील. क्रीडा प्रशिक्षक दरमहा वेतन न दिल्यास संस्था / कंपनी जबाबदार राहील. तसेच क्रीडा प्रशिक्षक यांच्या दरमहा वेतन अदा करण्यात येईल याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक महिन्याचे देयक कार्यालयात सादर करतांना मागील महिन्यातील क्रीडा प्रशिक्षक यांचे वेतन त्यांना अदा केल्याचे बॅकेचे विवरणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक राहील. अन्यथा देयकाचे भुगतान करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

७. क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून बॅडमिंटन व बॉक्सिंग या खेळांचे जिल्हा प्रतिभा विकास केंद्र कार्यान्वित करण्यासाठी आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित खेळाचे क्रीडा मार्गदर्शकांची नियुक्ती याच निविदेतील अटी व शर्तीनुसार करावी लागेल. बॅडमिंटन व बॉक्सिंग या खेळाचे क्रीडा मार्गदर्शकांची शैक्षणिक /क्रीडा पात्रता व अनुभव व इतर माहिती या कार्यालयाकडून नंतर उपलब्ध करुन देण्यात येईल.

८. सदर काम करार पद्धतीने करावयाचे असल्याने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव मार्फत कोणत्याही क्रीडा प्रशिक्षक यांना आस्थापना विषयी लाभ मिळणार नाही अथवा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव येथे सेवेचा हक्क मिळणार नाही. तसेच कोणत्याही क्रीडा प्रशिक्षक त्यांना देय असलेल्या देणी बाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव कडे मागणी करता येणार नाही.

९. शासनाच्या अटी व शर्तीस अधीन राहून उच्चतम , योग्य शैक्षणिक व क्रीडा विषयक अर्हता पुर्ण करणा-या क्रीडा प्रशिक्षकांची निवड ही जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे अधिपत्याखाली करावी लागेल.

१०. जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव चे कोणतेही आर्थिक नुकसान झाल्यास त्याची भरपाई करण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठादार संस्थेची / कंपनीची राहील व याचा अंतिम सर्व निर्णय जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव हे घेतील.

११. निविदेसोबत अनामत रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष) ऑनलाईन जमा करणे बंधनकारक राहील.

१२. सशर्त निविदा स्किारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१३. क्रीडा प्रशिक्षक यांच्या संख्येबाबत आवश्यकतेनुसार वाढ, घट किंवा फेरबदल करण्याचे सर्वस्वी अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांच्याकडे राखीव राहतील. क्रीडा प्रशिक्षक यांचे ठिकाण व क्रीडा प्रशिक्षक यांची संख्या आदेशामध्ये नमुद करण्यात येईल.

१४. कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१५. निविदेबाबतच्या अटी व शर्तीचे वाचन करुनच निविदा धारकांनी निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घ्यावा. निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यावर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१६. आवश्यक तेव्हा मुदतवाढ देण्याचा अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांनी राखुन ठेवलेले आहे.

१७. निविदेची किंमत नापरतावा रुपये ६०००/- (अक्षरी सहा हजार रुपये) राहील.

१८. ई-निविदा www.mahatenders.gov.in ऑनलाईन ई-निविदा पद्धतीमध्ये उपलब्ध असलेल्या माध्यमाने ऑनलाईन भरणा करावी.

१९. निविदा सोबत बयाना रक्कम म्हणुन रुपये १,००,०००/- **(अक्षरी एक लक्ष रूपये)** इतकी रक्कम www.mahatenders.gov.in ऑनलाईन भरणा करणे आवश्यक आहे.

२०. निवीदेतील इतर अटी व शर्ती निवीदेमध्ये दर्शविलेल्या आहेत, सदर निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

२१. क्रीडा प्रशिक्षक यांचे विमा, प्रवास भत्ते, प्रोव्हिडंट फंड ईत्यादी भत्ते सवलती अशा कोणत्याही प्रकारच्या खर्चाची प्रतिपुर्ती जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव कडून मिळणार नाही.

२२. क्रीडा प्रशिक्षक यांचे प्रोव्हिडंट फंड, ई.एस.आय. व्यवसाय कर, सेवाकर नोंदणी केल्याचे व अद्यावत भरणा केल्याशिवाय देयक अदा केले जाणार नाही.

२३. क्रीडा प्रशिक्षक यांच्या संख्येमध्ये वाढ किंवा कमी करणेचा अधिकार राखुन ठेवण्यात आलेला आहे. व त्या प्रमाणात रक्कम अदा करण्यात येईल.

२४. क्रीडा प्रशिक्षक यांच्या हजेरीपट हे जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांच्या प्रतिस्वाक्षरीने देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

२५. क्रीडा प्रशिक्षक यांच्या कामाबाबत तक्रार आल्यास आपली निविदा रद्द करुन निविदेपोटी भरलेली सुरक्षाठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

२६. क्रीडा प्रशिक्षक यांचे वेळापत्रक हे विभागामार्फत ठरवुन दिले जाईल. त्याप्रमाणे संबंधीत संस्थेस / कंपनीस कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

२७. क्रीडाप्रशिक्षक आय.डी.कार्ड कंपनी / संस्थेकडून देणे बंधनकारक राहील. याकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव कडून प्रतिपूर्ती मिळणार नाही.

२८. सर्व क्रीडा प्रशिक्षकाचे नांव, कायमचा राहण्याचा पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी वैयक्तिक तपशिलाची माहिती विभागास सादर करणे बंधनकारक राहील.

२९. जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांच्या परवानगी शिवाय क्रीडा प्रशिक्षक बदलता येणार नाही. एखादया क्रीडा प्रशिक्षक यांचे काम योग्य प्रकारे नसेल तर त्या बदल्यात अन्य क्रीडा प्रशिक्षक यांची जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगाव यांच्या सल्ल्याने तात्काळ नेमणुक करावी लागेल.

३०. जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव कडे नेमुन दिलेल्या क्रीडा प्रशिक्षक यांना अन्य ठिकाणी काम करता येणार नाही.

३१. क्रीडा प्रशिक्षक यांच्या प्रत्येक महिन्याचे देयक जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांच्याकडे प्रति महिनाच्या ५ तारखेच्या आत सादर करण्याची जबाबदारी संबंधित पात्र संस्था / कंपनीची राहील. देयक विलंबाने व एकत्रित (एकापेक्षा जास्त महिने) सादर केल्यास अशा प्रकारचे देयक अदा केले जाणार नाही.

३२. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. क्रीयुसे /मिशन लक्ष्यवेध/अंमलबजावणी/२०२५/का,१३/८१९४ दिनांक १३ मार्च २०२६ च्यानुसार निविदाधारकांनी निविदा सेवा शुल्क रक्कमेच्या मर्यादेपेक्षा अधिक दराने निविदा भरल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

३३. निविदा समान आल्यास सेवापुरवठा धारकाचा अनुभव कालावधी धरुन निविदा निश्चित करण्यात येईल.

३४. शासनाकडून निधी प्राप्त आल्यानंतरच क्रीडा प्रशिक्षक यांचे देयक अदा केले जाईल.

जगदीश चौधरी
जिल्हा क्रीडा अधिकारी,
जळगाव

## प्रपत्र अ

## कंत्राटी मनुष्यबळाबाबत अटी व शर्ती आणि कामाचे स्वरुप

१. निविदा धारकावर दखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे व पोलीस चारीत्र्य पडताळणी दाखल जोडावा.

२. निवीदेत सादर केलेल्या प्रत्येक कागदपत्रावर प्रोप्रायटर असल्यास यांचे स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे. स्वाक्षरी नसल्यास निविदा आहे त्या स्तरावर संबंधित निविदा नाकारण्यात येईल.

३. निविदा धारकाने स्वतःचे नांव व पूर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक, निवीदेत नमुद करावा.

४. कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या संस्थेची (यापुढे उक्त आस्थापना असा उल्लेख, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ खाली) नोंदणी झालेली असणे अनिवार्य आहे.

५. मनुष्यबळ उक्त आस्थापना कडून देण्यात येणाऱ्या वेतनाबाबत राज्य शासनाच्या किमान वेतन अधिनियमातील तुरतुदीचा भंग झाल्यास किंवा अनुचित कामगार प्रथा अवलंबिल्या गेल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपल्या संस्था/कंपनी राहील.

६. उक्त आस्थापने मार्फत नेमण्यात येणारे मनुष्यबळ २१ ते ४५ वयोगटातील सशक्त, सुदृढ, शिस्तबध्द, आज्ञाधारक आणि जबाबदारी समर्थपणे पार पाडण्यात आवश्यक साहित्यासह सज्ज असणे आवश्यक राहील.

७. नमुद जबाबदारी पार पाडतांना उद्भवणाऱ्या सर्व कायदेशीर बाबी उक्त आस्थापनेकडून हाताळण्यात येतील.

८. मनुष्यबळ व्यवस्था पुरविण्यासाठी करारबद्ध झाल्यानंतर उपरोक्त नमुद शासकीय मालमत्तेचे कोणत्याही कारणाने नुकसान झाल्यास त्याची भरपाई करणे उक्त आस्थापनेवर बंधनकारक राहील.

९. उक्त आस्थापनेच्या मनुष्यबळ व्यवस्थेतील हलगर्जीपणा किंवा अन्य कारणांमुळे नुकसान झाल्यास अशा प्रत्येक प्रसंगी देय असलेल्या रकमेतून किंवा यथास्थिती अनामत रकमेतुन प्रत्येकी नुकसानीच्या रकमेच्या दुप्पट रक्कम कपात करण्यात येईल.

१०. निविदा धारकानी निर्दिष्ट नमुन्यातच निविदा सादर करणे आवश्यक आहे. निविदेत दिलेल्या शर्ती व सर्वसाधारण निर्देश व सुचना काळजी पूर्वक वाचून घ्याव्यात. निविदा यथायोग्य भरण्यात यावी. आकडे सुवाच्च व अचुक असावेत. निवीदेमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करण्यात येऊ नये.

११. निवीदेमध्ये, निर्देशामध्ये अथवा अनुसूचीमध्ये केलेल्या कोणत्याही फेरफाराला मान्यता दिली जाणार नाही.

१२. निविदा सूचना व निविदाधारकाना पुरवण्यात आलेल्या सर्वसाधारण सुचनांमध्ये नमुद केलेले नियम निविदा धारकास बंधनकारक आहेत.

१३. नेमण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सक्षम असल्याचा व चारित्र्याचा दाखला तसेच नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांवर कुठलाही प्रकारचा गुन्हा नोंद नसल्या बाबतचा संबंधीत पोलीस कार्यालयाचा दाखला या कार्यालयास देणे निविदा धारकास बंधनकारक राहील.

१४. निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा करावा लागेल. निवीदेत भरलेली इ.एम.डी. रक्कम जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांच्याकडे सुरक्षा /अनामत जमा राहील.

१५. निविदा प्रक्रीयेतील बदला बाबत सक्षम प्राधिकाऱ्यास निवीदेमध्ये काही बदल करावयाचे असल्यास सदरच्या निवीदेची अंतिम दिनांकाच्या वेळेपूर्वी शुद्धी पत्रकाद्वारे बदल करु शकतात, सदर बदल हे ग्राहय मानले जाईल व त्यामुळे निविदा सादर करणेस अतिरिक्त कालावधी वाढविण्याचा हक्क जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांनी राखुन ठेवला आहे. या बाबतची माहिती अधिकृत संकेतस्थळावरुन प्रसिद्ध केली जाईल व ती माहिती भरुन इच्छिणाऱ्यांना लागू होईल.

१६. निविदा प्रक्रीयेबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास संबंधित निविदाधारकाने अथवा निविदा भरु इच्छिणाऱ्या सदर शंका अथवा तक्रार निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळेच्या ५ दिवस पुर्वी या कार्यालयाकडे लेखी सादर करावी. निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सदरच्या तक्रारी अथवा शंका विचारात घेतल्या जाणार नाही.

१७. ई-लिफाफा क्रं. १ (तांत्रिक) मध्ये नमुद केलेल्या आवश्यक अटींची पूर्तता असल्याची खात्री झाल्यास लिफाफा क्रं. २ उघडण्यात येईल. अन्यथा निविदाधारकाची निविदा रद्द समजण्यात येईल. अटी शिथील करण्याचा अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांना राहील. त्याबाबत निविदाधारकांना तक्रार करता येणार नाही.

१८. निवीदा प्रक्रीयेमध्ये निविदा वरती तक्रार करणाऱ्या निविदा धारकास रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष रूपये) इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे प्रथम जमा करावी लागेल. जर तक्रारी मध्ये तथ्य आढळल्यास संबंधीत तक्रारदारांची अनामत रक्कम परत करुन आरोप सिध्द झालेल्या निविदाधारकास निविदा प्रक्रीयेतुन वगळण्यात येऊन त्याची बयाना / अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तक्रार खोटी आढळल्यास तक्रार कर्त्याची अनामत रक्कम शासनास जमा केली जाईल. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज अथवा न्यायालयीन मागणी करता येणार नाही.

१९. सदर ई-निवीदे बाबत न्यायालयीन बाब उद्भवल्यास न्यायालयीन बाबीसाठी कार्यक्षेत्र जळगाव राहील.

२०. कंपनी / एजन्सीने दिलेल्या कर्मचारी यांचे दैनंदिन उपस्थितीपत्रक बायोमॅट्रीकद्वारा देयकासोबत जोड्णे आवश्यक राहिल.

## तांत्रिक लिफाफा क्रं. १ मध्ये सादर करावयाची कागदपत्रे

| | |
|---|---|
| १. | बयाना रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष रूपये) निविदा फार्म फी रुपये ६,०००/- अशी एकूण रुपये १,०६,०००/-(अक्षरी एक लक्ष सहा हजार रूपये) ऑनलाईन पद्धतीने जमा केल्याची पावती सादर करणे आवश्यक आहे. Submitted by Networking website by using www.mahatenders.gov.in |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्र / शॉप ॲक्ट प्रमाणपत्र |
| ३. | निविदा दस्तऐवजाच्या कोणत्याही स्पष्टीकरणाची आवश्यकता असलेल्या संभाव्य निविदाधारकाने अंतिम तारखेच्या ०५ दिवसाअगोदर ईमेलद्वारे संपर्क साधावा आणि ई-टेंडरिंग प्रक्रियेशी संबधीत प्रश्नांसाठी निविदा E-Mail - dsojal7080@gmail.com वर पाठवता येईल. E-Mail - dsojal7080@gmail.com वर संभाव्य निविदाकाराने या अंतिम तारखेनंतर कोणतेही स्पष्टीकरण आवश्यक असल्यास त्याचे स्वागत केले जाणार नाही. |
| ४. | मागील तीन आर्थिक वर्षापैकी कोणत्याही एका कालावधीत सार्वजनिक क्षेत्र (केंद्रीय किंवा राज्य) शासकीय / निमशासकीय संस्थेतील क्रीडाप्रशिक्षक पुरवठा सेवेचा विस्तृत अनुभव बोलीदाराकडे असावा किंवा पुर्ण झालेला असावा. |
| ५. | Financial Turnover Certificate Last Three Year From Tender Flash (आर्थिक उलाढाल मागील तीन वर्ष प्रमाणपत्र) सादर करावा, या प्रमाणपत्रावर Chartered Accountant यांची सही व शिक्का तसेच UDIN No. असणे बंधनकारक आहे. |
| ६. | जि.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडावे. |
| ७. | भविष्य निर्वाह निधी रजिस्ट्रेशन सर्टिफीकेटची छायांकित प्रत. |
| ८. | आयकर नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत (पॅनकार्डची छायांकित प्रत) |
| ९. | रक्कम रुपये ५,००,०००/-(अक्षरी पाच लक्ष रूपये) राष्ट्रीयकृत शेडयुल बॅकेचे सॉल्व्हेन्सी प्रमाणपत्र निविदेत सादर करणे आवश्यक आहे. |
| १०. | कामगार पुरविण्याचा परवाना (कमीत कमी १० पुरविण्याचा असणे आवश्यक) |
| ११. | निविदाधारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेले नाही. याबाबत निविदाधारकाने रुपये ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर शपथपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| १२. | मन्युष्यबळाचा तपशिल (प्रपत्र क) व सर्व प्रपत्र व्यवस्थित अपलोड करावे.<br>निवीदेतील संपूर्ण अटी व शर्ती निविदा धारकांना बंधनकारक राहील. वरील अटी व शर्ती नुसार कागदपत्रे ई-निवीदेत सादर करावीत अटी व शर्ती व्यतिरिक्त इतर कोणतेही कागदपत्र सादर करु नये, अटी शिथिल करणे, कमी दराची निविदा नाकारणे, निविदा स्विकारणे असे संपूर्ण अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांनी राखुन ठेवले आहेत. सदर निविदा प्रक्रीया ऑनलाईन असुन www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर निविदाधारकांनी सर्व माहिती पाहणे ई-निवीदेत नमूद केलेली कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यात पूर्ण असतील अशाच संस्थांचे दरपत्रक उघडण्यात येईल. सदर निवीदेत नमुद आवश्यक ते सर्व कागदपत्र निवीदेच्या अंतिम तारखेपर्यंत अपलोड करणे बंधनकारक राहील. यानंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत. याबाबत सर्व अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांना राहील. |

## वित्तीय / व्यापारी लिफाफा क्रं. २

| | |
|---|---|
| १ | लिफाफा क्र. २ सादर करणे बंधनकारक आहे. |
| २ | मनुष्यबळ पुरवठा करण्यास संबधित एजन्सीला सेवा शुल्क स्वरुपात मोबदला अदा करावयाचा आहे. त्यासाठी संस्थेनी त्यांना आवश्यक असणारा सेवा शुल्काची रक्कम ५% टक्केवारी पेक्षा जास्त नसावी. |
| ३ | टिप :- निविदा धारकांवर दखलपात्र गुन्हा असल्यास तसेच निविदा धारक या पूर्वी सदरची सेवा देत असतांना सेवा घेणाऱ्या संस्थेकडून संबंधित निविदा धारकांवर अव्यवहार्य सेवा दिल्याबाबत या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास अथवा निविदा धारक शासकीय अथवा निमशासकीय संस्थेचा काळया यादीत समाविष्ट असल्यास सदरची निविदा असेल त्याच स्तरावर रद्द करण्यात येईल. तसेच संबंधीत निविदाधारकांने अगोदरच्या ई-निवीदेत कोणत्याही कागदपत्रामध्ये अफरातर, वार्षिक उलाढाल प्रमाणात कमी अगर जास्त दाखविले असेल त्यांनी निवीदेत सहभागी होऊ नये असे आढळल्यास त्यांची निविदा रद्द करुन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. |
| ४ | ➢ वेळोवेळी वरीष्ठ कार्यालयाकडून, शासनाकडून, मा. न्यायालयाकडून आलेले आदेश मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेवर बंधनकारक राहील. |
| ५ | ➢ निविदाधारकाचे कामकाज समाधानकारक न आढळून आल्यास किंवा काही तक्रारी निर्माण झाल्यास करारनामा कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल. तसेच उपरोक्त अटीशिवाय परिस्थिती निहाय बदल करण्याचा अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांना राहील व तो कंपनी / एजन्सी बंधनकारक राहील. निविदाधारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रत्येक पानावर त्याची स्वत:ची सही व शिक्का असणे आवश्यक / सहकारी संस्था असल्यास चेअरमन यांची सही असणे आवश्यक आहे. त्याशिवाय निवीदेचा विचार केला जाणार नाही. पी.एफ. भरणेची जबाबदारी कंपनी / एजन्सी यांची राहील. याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांचा संबंध राहणार नाही. |
| ६ | ➢ निविदाअर्ज कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे, रद्द, करणे, तसेच निविदा उघडणेच्या वेळेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांना राहील. |
| ७ | ➢ मनुष्यबळ सेवा पुरविणे करिता आवश्यक त्या सर्व वस्तु व साधनसामग्री कंपनी / एजन्सी मार्फत कर्मचाऱ्यांना पुरविल्या जाणे बंधनकारक राहील. |
| ८ | ➢ नियुक्त केलेले सर्व कर्मचारी हे कंत्राटी पद्धतीने असल्याने त्यांना शासकीय सेवेत असल्याचा कोणताही लाभ मिळणार नाही किंवा त्यांना नियमित शासकीय सेवेवर हक्क सांगता येणार नाही. |
| ९ | ➢ वरील नियम व अटी मी /आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असुन त्या मला/ आम्हाला पूर्णपणे मान्य व बंधनकारक आहेत. निविदाधारकांनी वरील सर्व अटी व शर्तीच्या अधीन राहुन नमुद केलेल्या प्रमाणकानुसार सेवेबाबतचे दर नमुद करावेत. सदर ई-निविदा प्रक्रीयेस अंतिमनिर्णय होईपर्यंत बयाणा रक्कम परत केली जाणार नाही. तसेच विलंब झाल्यास सदर रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दंड दिले जाणार नाही. |

| | |
|---|---|
| १० | प्राप्त झालेल्या निवीदांपैकी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा काही कारण न दाखविता नाकारण्याचा तसेच सेवांची संख्या कमी किंवा अधिक करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे. |

जगदीश चौधरी
जिल्हा क्रीडा अधिकारी,
जळगाव

प्रपत्र – ब

स्वयंघोषणापत्र

(Non-Defaulter Certificate)

मी / आम्ही निवीदेच्या अटी व शर्तीचे काळजीपूर्वक वाचन केले असुन त्या सर्व समजून घेतल्या आहेत व मी / आम्हाला शासकीय कार्यालयामध्ये क्रीडा प्रशिक्षक ही पदे पूरविणेबाबत कोणत्याही प्रकारची आर्थिक / दंडात्मक कार्यवाही / शास्ती कोणत्याही शासकीय कार्यालयामार्फत झालेली नाही व काळया यादीत टाकण्यात आलेले नाही.

वरील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व सत्य आहे. मी आवश्यकतेप्रमाणे सेवा न पुरविल्यास अथवा भविष्यात माहिती उघड निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार दंडनीय कार्यवाहीस तसेच भारतीय न्याय संहिता कलम २३६ व २३७ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

सदर मजकूर मी आज दिनांक / / २०२६ रोजी प्रमाणित केलेला आहे.

दिनांक :-

स्थळ :-

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

प्रपत्र – क

कंपणी किंवा एजन्सीकडे उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाबाबतयादी

| अ.क्र . | कर्मचाऱ्याचे नाव | आधार आयडी | अर्हता | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

Signature Not Verified
Digitally signed by Jagadish Ramesh Chaudhari
Date: 2026.05.19 17:49:49 IST
Location: Maharashtra-MH